सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानातील लहान व मध्यम शहरांतील पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या अभियानांतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस भुयारी गटार (मलनिस्सारण) योजनेसाठी केंद्रशासन व राज्य शासनाचे अनुदान वितरण

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकिय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी,
मुंबई ४०० ०३०.
नपप्रस/UIDSSMT/ औरंगाबाद मनपा/संक्र३९५६ /२०१४/कक्ष-१३
दिनांक :-२०मे, २०१४.

संदर्भ :- १) केंद्रीय वित्त मंत्रालयाचे आदेश क्र. एफ-५९(३)/पीएफ-१/२०१३-१५३१ दि. १९ फेबुवारी, २०१४.
२) नगर विकास विभाग निर्णय क्र. युआयडी-२०१४/प्र.क्र. ६७ (१)/नवि-३३ दिनांक २४ मार्च २०१४.
३) नगर विकास विभाग निर्णय क्र. युआयडी-२०१४/प्र.क्र. ६७ (२)/नवि-३३ दिनांक २४ मार्च २०१४.
४) नगर विकास विभाग निर्णय क्र. युआयडी-२०१४/प्र.क्र. ६७ (१)/नवि-३३ दिनांक १३ मे २०१४.
५) नगर विकास विभाग निर्णय क्र. युआयडी-२०१४/प्र.क्र. ६७ (२)/नवि-३३ दिनांक १३ मे २०१४.

## आदेश

उपरोक्त संदर्भाधीन क्रं. १ येथील शासन आदेशांन्वये केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्नर्निर्माण अभियानातील लहान व मध्यम शहराच्या पायाभूत सोयी - सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या उपअभियानांतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस भुयारी गटार (मलनिस्सारण) योजनेसाठी केंद्रशासनाच्या हिश्याचे अनुदान वितरीत केले आहे. त्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रं. २ व ३ वरील शासन निर्णयान्वये नगर विकास विभागाने नगरपरिषद प्रशासन संचालनालय येथे निधी आहरीत करुन ठेवला होता.

०२. खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे लहान व मध्यम शहराच्या पायाभूत सोयी - सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या उपअभियानांतर्गत संदर्भाधीन क्रं. ४ व ५ वरील शासन निर्णयान्वये नगर विकास विभागाने संचालनालयामध्ये आहरीत करुन ठेवलेला निधी वितरीत करण्यास मंजुरी दिली असुन खालील प्रमाणे निधी वितरीत करण्यात येत आहे.

(रुपये कोटीमध्ये)

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | योजनेचे स्वरूप | मंजूर किंमत | सध्या वितरीत करावयाचा केंद्र शासनाचा हिस्सा | सध्या वितरीत करावयाचा राज्य शासनाचा हिस्सा | एकूण वितरीत करावयाचे अनुदान (५+६) | केंद्रशास व राज शासनान सध्या वितरीत केलेल्या हप्त्याचा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | औरंगाबाद महानगरपालिका जि. औरंगाबाद | भुयारी गटार (मलनिस्सारण) योजना | ३६५.६८८९ | १४६.२७५६ | १८.२८४४ | १६४.५६०० | पहिला |

०३. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्रिपक्षीय करारनाम्यात नमूद केलेल्या सुधारणांबाबत वर्षनिहाय केलेली प्रगती पाहून तसेच वितरीत केलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र दिल्यानंतरच सदर योजनेअंतर्गत केंद्रशासन व राज्यशासनाचा पुढील हप्ता वितरीत करण्यात येईल.

०४. केंद्रशासनाकडून प्रत्यक्ष पाहणीद्वारे या योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा तसेच सुधारणा क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेण्यात येईल. सदर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने दर ३ महिन्यांनी राज्यस्तरीय नोडल एजंन्सी मार्फत केंद्र तसेच राज्य शासनाच्या हिश्श्याच्या अनुदानाच्या विनियोगबाबतचा अहवाल केंद्रशासन तसेच राज्य शासनास सादर करावा. अशाप्रकारे तिमाही अहवाल सादर करण्यास विलंब झाल्यास त्यांना पुढील हिस्सा प्रलंबित विनियोग अहवाल प्राप्त होईपर्यंत वितरीत करण्यात येणार नाही.

०५. प्रस्तुत योजनेतंर्गत सदर प्रकल्पाची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर या योजनेमधून काय साध्य झाले याबाबतचा अहवाल सदर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने केंद्र शासन व राज्य शासनास सादर करावा.

२०/५/२०१४

(डॉ. पुरुषोत्तम भापकर)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति :-

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, मुंबई
३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग(नवि-२), मुंबई-३२
४) अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) जिल्हाधिकारी, औरंगाबाद
८) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका जि. औरंगाबाद
९) निवड नस्ती. कार्या. १३